REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 11 | AUGUST - 2018

# भारतातील निर्वाचन प्रक्रिया : समस्या आणि उपाय

प्रा. डॉ. ढोबळे डी. बी.
सहाय्यक प्राध्यापक , श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा, जि. उस्मानाबाद.

## प्रस्तावना -



जगातील सर्वात मोठी लोकशाही आणि प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून भारताचा उल्लेख केला जातो.कोणत्याही लोकशाही आणि प्रजासत्ताक राष्ट्राचा निवडणूक हा महत्वाचा भाग असतो. अर्थात निवडणूक प्रणाली हा लोकशाहीप्रणालीचा प्राण असतो. त्यासाठी निवडणूक प्रक्रिया पार पाडणारी स्वतंत्र व्यवस्था असावी लागते.निवडणूकांचे प्रशासन निवडणूक प्रक्रियेवरचा लोकांचा विश्वास टिकून रहावा अशा पद्धतीने व्हायचे तर स्वतंत्र यंत्रणेची गरज असते. भारतीय संविधानकारांनी अशा स्वतंत्र यंत्रणेची निर्मिति केली, निर्वाचन आयोग म्हणून ओळखली जाते. स्वतंत्र आणि निष्पक्ष आयोगाशिवाय लोकशाहीतील खरे प्रतिनिधिक शासन अस्तित्वात येणार नाही. भारताने प्रातिनिधिक शासन पद्धतीचा स्वीकार केला आहे. जनता आपले प्रतिनिधी निवडणुकांच्या माध्यमातून निवडून देते आणि प्रतिनिधीचे शासन अस्तित्वात येते. लोकशाही मूल्ये अस्तित्वात आणावयाची असतील तर योग्य प्रतिनिधीची निवड होणे गरजेचे असते. भारतात केंद्र आणि राज्य स्तरावर सातत्याने निवडणुका होतात. ह्या निवडणुकांच्या माध्यमातून सत्तेवर आलेल्या सरकारला अधिमान्यता प्राप्त होते. जर सरकार जनतेच्या अपेक्षानुसार काम करत नसेल तर पुढच्या निवडणुकीत ते सरकार बदलायाचा जनतेला अधिकार असतो. अर्थात निवडणुका ह्या जनमताची अभिव्यक्ति असतात. त्यामुळे लोकशाही राष्ट्रात निवडणूक आयोगाची भूमिका महत्वाची असते.

भारतीय संविधानकारांना निवडणुकांचे महत्व माहित असल्यामुळे त्यांनी निवडणूक आयोगाला संवैधानिक दर्जा दिला. देशातील राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, संसद आणि राज्यविधिमंडळाच्या निवडणुकांचे संचालन करण्याची जबाबदारी निवडणूक आयोगावर सोपविली. निवडणुकांचे संचालन निष्पक्षपणे करता यावे यासाठी आयोगाला स्वायत्त दर्जा देण्यात आला. निवडणूक आयोगाच्या निष्पक्षपणावरच लोकशाहीचे भवितव्य अवलंबून असते. "सार्वजनिक निवडणुका काटेकोरपणे आणि कार्यक्षमतेने पारपाडल्या नाही तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थाच संकटात सापडते". असे पोलाक नामक विचावंत म्हणतो. नागरिकांमध्ये सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याची भावना आणि राज्यव्यवस्थेबद्दलची आत्मीयता निर्माण करण्याचे सर्वात मोठे माध्यम निवडणुका हे असते. भारतात 1952 पासून आजपर्यंत निवडणूक आयोगाने यासाठी महत्वपूर्ण भूमिका पारपाडली आहे. परंतु भारतातील निर्वाचन पद्धति,निवाडनुकीतील प्रचार माध्यमे आणि निवडणुकांमधील मतदार आणि उमेदवारांमधिल उदासीन व्यवहार यावरून भारतीय निर्वाचन प्रक्रियेत काही समस्या निर्माण झाल्या आहेत. त्या सुदृढ लोकशाहीसाठी घातक आहेत. याच समस्यांचा वेध प्रस्तुत शोधनिबंधात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## उद्दिष्टये -

1. भारतीय निवडणूक आयोग आणि निवडणूक पद्धतिचे विश्लेषण करणे.
2. भारतीय निवडणूक पद्धती समोरील आव्हानांचा अभ्यास करणे.
3. मुक्त, निर्भय आणि पारदर्शी निवडणूकांसाठी उपायांची मांडणी करणे.

**भारतीय निवडणूक आयोग-**

**भारतीय संविधानाने भारतातील निवडणुकांचे संचालन करण्यासाठी एका स्वतंत्र निवडणूक आयोगाची स्थापना केली आहे. संविधानाच्या कलम 324 ते 329 मध्ये आयोगाच्या स्थापना आणि अधिकार कार्याविषयी तरतूदी केल्या आहेत. त्यानुसार देशाची संपूर्ण निवडणूक प्रक्रिया सर्वस्वी एकाच मध्यवर्ती निवडणूक यंत्रणेच्या हाती सोपविली असून तिच्या मदतीसाठी प्रादेशिक आयुक्तांची तरतूद केली आहे. प्रादेशिक आयुक्तांनी राज्याच्या राज्यपालांच्या नव्हे तर मध्यवर्ती निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शन आणि नियंत्रणाखाली काम करावे. ही वस्तुस्थिति नोंदवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते कि आधी जे अधिकार राज्यपालावर सोपवायाचे ठरले होते ते निवडणूक आयोगाकडे दिले हा बदल मुलगामीच म्हणावा लागेल. निवडणूक प्रशासनाचे केंद्रीकरण काही स्पष्ट हेतुसाठी केले गेले आहे. मुख्य हेतु असा की वांशिक, भाषिक, सांस्कृतिकदृष्टया राज्यातील लोकांपेक्षा वेगळ्या असलेल्या जनसमुहावर प्रांतीय सरकारकडून संभवणाऱ्या अन्यायावर प्रतिबंध बसावा हा हेतु होता. पूर्वी एकसदस्यीय असणारा निवडणूक आयोग आज बहुसदस्यीय करण्यात आला आहे. त्यामुळे आयोगाला आपले निर्णय बहुमताने घ्यावे लागतात. कलम 243 नुसार सर्वच घटक राज्यामध्ये राज्य निवडणूक आयोगाची स्थापना केली आहे. राज्य निवडणूक आयोग राज्यातील स्थानिक संस्थाच्या निवडणूकांचे संचालन करतो.**

**भारतातील निवडणूक पद्धती -**

**भारतात दोन प्रकारच्या मतदान पद्धतीचा अवलंब केला जातो. एक, प्रत्यक्ष मतदान पध्दती, ज्यात जनता आपले प्रतिनिधी प्रत्यक्ष मतदान करुन निवडून पाठवतात. निवडणूकिला उभ्या असणाऱ्या उमेदवारांपैकी ज्यास सर्वाधिक मात प्राप्त होतील तो उमेदवार निवडून येतो. या पद्धतीने लोकसभा, विधानसभा आणि राज्यांमधील स्थानिक संस्थामधील प्रतिनिधि निवडले जातात. दोन, प्रमाणशिर प्रतिनिधित्वाची क्रमदेय एकमतदान पद्धती. या पद्धतीने उमेदवारास निवडून येण्यासाठी विशिष्ट मतांचा कोटा पूर्ण करावा लागतो. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्यसभा आणि विधानपरिषदेच्या प्रतिनिधीची निवड केली जाते. भारतीय निर्वाचन पद्धतीची काही महत्वाची वैशिष्टये पुढील प्रमाणे सांगता येतील.**

**भारतात सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराचे तत्व स्विकारले आहे. वयाची 18 वर्ष पूर्ण करणाऱ्या प्रत्येक भारतीयांना मतदानाचा अधिकार दिला आहे. त्यासाठी वंश, जात, धर्म, शैक्षणिक पात्रता किंवा अन्य कोणत्याही अटी शिवाय मतदानाचा अधिकार दिला आहे, त्यामागे सर्वांना राजकीय प्रक्रियेत सहभागी करुन घेता यावे हाच हेतु होता. भारतातील सामाजिक स्थिति लक्षात घेता सर्व मागास समुहांना योग्य प्रतिनिधित्व मिळावे यासाठी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी लोकसभा आणि विधानसभा मध्ये राखीव जागांची तरतूद केली आहे. राज्यसभा आणि विधानपरिषदे मध्ये जातीय राखीव जागांची तरतूद नाही. लोकसभा आणि विधानसभेतील प्रतिनिधी एकसदस्यीय मतदारसंघातुन निवडून दिले जातात. हे मतदारसंघ लोकसंखेच्या आधारावर निवडणूक आयोगाकडून तयार केले जातात, सध्याचे मतदारसंघ 2026 सालापर्यंत कायम करण्यात आले आहेत. गुप्त मतदान पद्धती हे भारतीय निर्वाचन पद्धतीचे महत्वाचे वैशिष्टये आहे. सध्या मतदार निर्भिडपणाने आपले मत मतदान यंत्रावर नोंदवतात. राजकीय पक्ष हा निर्वाचन प्रक्रियेतील महत्वाचा भाग असतात. भारतातील बहुपक्ष पद्धतिमुळे मतदारांना उमेदवारांची निवड करण्याचे स्वातंत्र्य मिळते. भारतीय निर्वाचन प्रक्रियेतील ह्या सर्व बाबी प्रतिनिधिक लोकशाहीला प्रगल्भ करणाऱ्या आहेत.**

**भारतातील निवडणूक पद्धतीतील दोष -**

**जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारतात निर्वाचन आयोगाने आज पर्यंत झालेल्या निवडणुकामध्ये निष्पक्ष भूमिका पारपाडल्यामुळेच निकोप लोकशाही टिकून आहे. संविधानाने स्विकारलेल्या निर्वाचन पद्धतीनुसार निर्वाचन आयोगाने 16 लोकसभेच्या आणि घटकराज्यांच्या निवडणुका यशस्वीपणे घेतल्या . परंतु असे असले तरी भारतीय राजकारणातील बदलत्या परिस्थितिमुळे निकोप आणि निर्भिडपणे निवडनुकांचे संचालन करने कठिन झाले आहे. परिणामी**

अनेक वेळा योग्य त्या प्रतिनिधींची निवड होत नाही. भारतीय निर्वाचन पद्धतीतिल काही प्रमुख समस्यांचा विचार करुनच निर्वाचन सुधारणांचा आढावा घेता येईल.

भारतातील निर्वाचन पद्धतीमध्येच काही दोष आढळून येतात. लोकसभा, विधानसभेसाठी ज्या साध्या मतदान पद्धतीने मतदान घेतले जाते त्यात ज्या उमेदवारास सर्वाधिक मते मिळतील तो निवडून येतो. मात्र प्रत्यक्षात विजयी उमेदवारास पन्नास टक्के पेक्षा अधिक मते मिळालेली असत नाहीत. विजयी उमेदवाराच्या विरोधात गेलेल्या मतांची संख्या अधिक असते. त्यामुळे अल्पमते मिळवणारे उमेदवार या पद्धतिमुळे विजयी होतात. बहुमताच्या संकल्पनेमुळे ज्या पक्षाला बहुमत असेल तो सत्ताधारी बनतो, मात्र त्या पक्षाला एकून मिळालेली मते आणि एकून मिळालेल्या जागा यांचे प्रमाण विसंगत असते.

भारतीय निवडणूकीतील पैशांचा वापर एक मोठी समस्या आहे. २०१४मध्ये लोकसभा आणि काही राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत देशातील राजकीय पक्षांनी किती खर्च केला याची माहिती निवडणूक आयोगाने जाहीर केली आहे.२०१४च्या लोकसभा आणि आंध्रपद्रेश, ओदिशा आणि सिक्कीम राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने सर्वाधिक ७१४ कोटी रुपये खर्च केले तर काँग्रेसने ५१६ कोटी रुपये खर्च केले. भाजप, काँग्रेससोबत या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने ५१ कोटी तर बसपाने तीस कोटीहून अधिक खर्च केला तर कम्युनिस्ट पक्षाने १८ कोटीहून अधिक खर्च केला गेल्या पाच वर्षात देशात झालेल्या सर्व निवडणुकांमध्ये तब्बल दीड लाख कोटी रुपये खर्च झाले आहेत. सीएमएस' या थिंक टँकने केलेल्या अभ्यासात ही माहिती उघड झाली आहे. देशातील भ्रष्टाचारातून ही बेहिशेबी संपत्ती तयार झाली. दीड लाख कोटींपैकी ३० हजार कोटी रुपये सध्याच्या लोकसभा निवडणुकीसाठी, ४५ ते ५० हजार कोटी विधानसभा निवडणुकीसाठी खर्च झाले आहेत, असे 'सीएमएस'चे अध्यक्ष एन. भास्कर राव यांनी सांगितले. .कॉर्पोरेट कंपन्यांकडूनही मोठया प्रमाणावर उमेदवारांना पैसा पुरवला जातो. मात्र निवडून येऊन आपल्या फायद्याच्या असलेल्या उमेदवारांना ही मदत मिळते. पक्षांकडून उमेदवारांना मोठया प्रमाणावर निधीचा पुरवठा केला जातो. त्यामुळे पक्षांचा निवडणूक खर्च वाढत जातो. राजकीय पक्षांकडून मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो कारण निवडणूकीला उभ्या असणाऱ्या उमेदवारांची मालमत्ता मोठी आहे. 16 व्या लोकसभेतील सदस्याची सरासरी संपत्ती पुढील तक्त्यात दर्शविली आहे.

**16 व्या लोकसभेतील सदस्याची सरासरी संपत्ती**

| अ. क्र. | राजकीय पक्ष | सदस्याची सरासरी सम्पत्ती (रु. कोटीमध्ये) | अ. क्र. | राजकीय पक्ष | सदस्याची सरासरी सम्पत्ती (रु. कोटी मध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | भारतीय जनता पार्टी | 11.6 cr | 08 | मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी | 79.8 lakh |
| 2 | भारतीय राष्ट्रीय कॉ ग्रेर | 16.7 cr | 09 | लोकजनशक्ति पार्टी | 2.5 cr |
| 3 | ए आई डी एम के | 6.5 cr | 10 | राष्ट्रवादी कांग्रेस | 37.3 cr |
| 4 | बीजू जनता दल | 16.5 cr | 11 | आरजेडी | 4.3 cr |
| 5 | शिवसेना | 9.2 cr | 12 | पीडीपी | 39.7 cr |
| 6 | तेलगु देसम पार्टी | 64 cr | 13 | जेडीयू | 1.7 cr |
| 7 | तेलंगाना राष्ट्र समिती | 63.7 cr | 14 | आप | 3 cr |

Source: Association for Democratic Reform

वरील प्रमाणे राजकीय पक्षांच्या सदस्यांची वाढत जाणारी मालमत्ता निवडणूकीतील पैशांचा गैरवापर होण्यासाठी कारणीभूत आहेत.

भारतीय निर्वाचन पद्धती मध्ये निर्वाचन हिंसा हा गंभीर प्रश्न बनला आहे. काहीही झाले तरी निवडून यायचे ही वृती हिंसेला जन्म देते. जातीय हिंसा घडवून आणने, मतदान केंद्र ताब्यात घेणे, मतदारांना धमकावने असे प्रकार अनेक

वेळा घडतात. त्यामुळे नागरिकांना आपले मत निर्भिड पणाने नोंदवता येत नाही. जशी जशी लोकशाही प्रगल्भ होत जाईल तस तसी निवडणूक हिंसा कमी होण्याऐवजी ती वाढताच आहे. आमच्या देशात साम्प्रदायिक हिंसेपेक्षा राजकीय हिंसेत अधिक लोकांचा बळी जाऊ लागला आहे. नेशनल क्राइम रिकार्ड्स ब्यूरो च्या अहवालानुसार 2014 मध्ये राजकीय हिंसेत 2400 लोकांचा मृत्यू झाला. य. दि. फडके म्हणतात त्या प्रमाणे राजकारण हा अनेकांचा पूर्णवेळ व्यवसाय बनला आहे.1977 नंतर राजकारणातील ही गुन्हेगारी प्रवृती अधिक वाढू लागली आहे. भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने ही चिंताजनक बाब आहे. निवडणूक आयोगाने 1997 मध्ये जाहिर केलेल्या माहितीनुसार देशातील विविध राज्यातील विधानसभांमधील 700 आमदारांना अपराधी म्हणून ओळखले जात असे. मनी, मसल आणि माफिया हे तीन 'मकार' आजचे भारतीय राजकारण नियंत्रित करीत आहेत. राजकीय पक्ष निवडून येण्याची क्षमता एवढाच निकष लावून उमेदवारी देतात, त्यामुळे गुन्हेगारांना राजकीय प्रवेश सहज मिळतो. गुन्हेगार आपल्या सर्व क्षमता वापरून निवडून येतात, राजकारणातील गुन्हेगारीकरण वाढत गेले आहे.निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळवरील माहितीनुसार 2009 च्या तुलनेत 2016 च्या लोकसभा निवडणुकीत गुह्यांची नोंद असलेल्या प्रतिनिर्धीच्या संख्येत 158 वरुन 185 म्हणजे 27 ने वाढ झाली आहे,या वाढीचे प्रमाण 17.08 टक्के एवढे आहे. 1997 मध्ये निर्वाचन आयुक्त कृष्णमूर्ती यांनी अशी भीती व्यक्त केली की " कायदा मोडणारे कायदा करणारे होवू नयेत". आता ही भीती खरी ठरू लागली आहे. सर्वच राजकीय पक्ष या गुन्हेगारीला आळा घालण्याऐवजी प्रोत्साहन देवू लागले आहेत. ही प्रतिनिधीक लोकशाहीसाठी धोक्याची बाब आहे. गुन्हेगारांना राजकीय प्रवेशापासून थांबविण्यासाठी कायद्याने प्रतिबंध घातल्याशिवाय निवडणूक आयोग गुन्हेगारांना आवर घालू शकणार नाही.

भारतीय निर्वाचन प्रक्रियेत इतरही अनेक दोष आहेत. लोकशाही ही बहु मताच्या आधारावर चालते मात्र भारतातील सार्वत्रिक मतदानाचा टक्का 66 पेक्षा वर कधीच गेला नाही. त्यामुळे अल्प मते मिळवणारे उमेदवार विजयी होतात. पक्षांतराचे वाढते प्रमाण, मतदारसंघातील निवडणूकीला उभे राहणाऱ्या उमेदवारांची वाढती संख्या यासारख्या अनेक बाबी निर्वाचन पद्धती समोर आव्हान निर्माण केल्या आहेत.

## निवडणूक सुधारणांची आवश्यकता-

भारतीय निर्वाचन प्रक्रियेत अनेक दोष आढळत असले तरी शक्य तेवढ्या निष्पक्ष वातावरणात निवडणुकांच्या संचलनाचे काम आयोगाने केले आहे. असे असले तरी वर उल्लेख केल्या प्रमाणे भारतातील मतदान पद्धती, निवडणूकांमधिल पैशांचा गैरवापर, हिंसाचार, मतासां केंद्र ताब्यात घेणे, राजकारणातील वाढते गुन्हेगारीकरण, मतदारांची उदासीनता अशा अनेक दोषामुळे भारतातील निर्वाचन पद्धतीत सुधारणांची आवश्यकता सर्वानाच जाणवत आहे. त्यामुळेच आज निर्वाचन सुधारणांची चर्चा सर्वत्र होते. परंतु ही चर्चा काही नवीन नाही. 1974 साली नेमलेली तारकुंडे समीती आणि 1990 मध्ये स्थापन केलेली दिनेश गोस्वामी समीती यांनी निर्वाचन सुधारणांसाठी काही उपाय योजना सूचवल्या, मात्र काही सिफारसी वगळता फारशी अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे अजूनही निर्वाचन पद्धतीत सुधारणांची आवश्यकता जाणवते.

भारतात निवडणुकामध्ये होणारी आर्थीक उलाढाल ही गंभीर बाब आहे. 1964 साली स्थापन केलेल्या संथानम समितीने असे मत नोंदवले की राजकीय पक्ष निवडणुकांसाठी गोळा करत असलेल्या निधी मुळे निवडणूकांमध्ये पैशांचा गैरवापर वाढला आहे, त्यामुळे राजकीय पक्षांच्या खर्चाचे हिशोब चोख ठेवणे आवश्यक आहे. निवडणुकीतील पैशांचा गैरवापर थांबवायाचा असेल तर उमेदवाराच्या प्रचाराचा खर्च सरकारने करावा आणि राजकीय पक्षांच्या उत्पन्न आणि खर्चाचे हिशोब काटेकोरपने तपासावेत. निवडणुक आयोगाने घालून दिलेल्या खर्चाच्या मर्यादेपेक्षा उमेदवारांकडुन अधिक खर्च केला जातो. राज्याने खर्च करणे आणि आयोगाने हिशोब ठेवणे ह्या दोनही गोष्टी व्यावहारिक पातळीवर कठीन आहेत. भारतीय निवडनुकांमध्ये काळ्या पैशांचा होणारा वापर, त्या आधारे होणारी मत खरेदी ही व्यवस्थेच्या खोलवर रुजली आहे. आर्थिक सत्ता आणि राजकीय सत्ता यांच्यात जी विविध स्वरूपाची देवानघेवाण होत असते तिच्यात

निवडणुकीतील पैशांच्या प्रभावाची पाळेमुळे पसरलेली असतात. तेंव्हा नियमांची मलमपट्टी करुन ही समस्या सुटणार नाही. त्यासाठी मूलगामी सामाजिक-आर्थिक परिवर्तनच घडवून आणावे लागेल.

राजकारणातील गुन्हेगारीचे वाढते प्रमाण निर्वाचन प्रक्रियेसमोरील मोठे आव्हान आहे. यावर उपाय म्हणून 28 मे 2002 रोजी निवडणूक आयोगाने असे आदेश काढले की उमेदवाराने अर्ज भरताना काही माहीती भरणे आवश्यक आहे. ज्यात उमेदवारास एखाद्या गुन्ह्यासाठी शिक्षा झाली काय, अर्ज भरताना दोन किंवा अधिक वर्षासाठी शिक्षा होवू शकेल असा गुन्हा दाखल आहे काय ? सरकारची यावर प्रतिक्रिया फारशी अनुकूल नव्हती. मात्र निवडणूक प्रक्रिया न्याय्य आणि मुक्त करण्यासाठी राजकारणातील गुन्हेगारीचे वाढते प्रमाण थांबविण्याची गरज आहे.भारतातील मतदारांची उदासीनता हा लोकशाही समोरचा मोठा धोका आहे. आज पर्यंत 60 ते 65 टक्के पेक्षा अधीक मतदान झाले नाही. उर्वरित 35 ते 40 टक्के लोक या प्रक्रियेपासून दूर राहतात. एवढ्या कमी मतसंख्येने निवडून आलेले सरकार खरे प्रातिनिधिक सरकार म्हणता येणार नाही. त्यामुळे ऑस्ट्रेलिया सारखी अनिवार्य मतदान पद्धती स्विकारावी असा विचार पुढे येतो. मागे गुजरात राज्याने स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत अनिवार्य मतदान करण्याचा निर्णय घेतला मात्र त्यावरही टीका झाली. भारतासारख्या राष्ट्रात अनिवार्य मतदान असणे आवश्यक आहे. निवडणूकांमधील उमेदवारांचे वाढते प्रमाण, पक्षांतराचे वाढते प्रमाण थांबविण्याची गरज आहे. ह्या सगळ्या सुधारणा करण्यासाठी केवल कायदे करुन चालणार नाही. त्यात गुणात्मक सुधारणांची आवश्यकता आहे. कोणत्याही मूलभूत सुधारणा करण्याची राज्यकर्त्यांची तयारी नसते. त्यासाठी नागरिकांनीच पुढाकार घेण्याची आणि स्वतःच्या वर्तनात बदल घडवण्याची आवश्यकता आहे. आपण सगळे या समाजव्यवस्थेचे घटक असल्यामुळे या परिस्थितिची अंशतः जबाबदारी आपल्यावरही येते. समाज बदलल्या शिवाय निवडणूक व्यवस्था बदलने अशक्य आहे.

## संदर्भ सूची

1. डॉ. भास्कर भोळे, भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपलापुरे अँड पब्लिशर्स , नागपुर, 2003.
2. www.nationalelectionwatch.org
3. www.adrindia.org
4. प्रा. व्ही. एल. एरंडे, भारतीय लोकशाही: अपेक्षा आणि वास्तव, निर्मल प्रकाशन नांदेड
5. डॉ. राजेश जैन डालचंद जैन, भारतीय राजनीति के नये आयाम, कॉलेज बुक डिपो जयपूर.



प्रा. डॉ. ढोबळे डी. बी.
सहाय्यक प्राध्यापक , श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा, जि. उस्मानाबाद.